# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:01.06.2026** **वार:सोमवार**

---

1. समाजासाठी चांगलं काम करणाऱ्या व्यक्तींकडून प्रेरणा घेऊन चांगलं काम करण्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून आवाहन
2. जनरल एन. एस. राजा सुब्रमणी देशाचे नवे सरसेनाध्यक्ष
3. ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचं निधन; संगीत विश्वावर शोककळा
4. सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीचं विजेतेपद भारतीय जोडीकडे आणि
5. आय पी एल क्रिकेट स्पर्धेत, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ दुसऱ्यांदा विजेता.

**<u>मन की बात</u>**

देशहितासाठी, समाजहितासाठी असामान्य कार्य करणाऱ्या विविध ठिकाणच्या नागरिकांच्या कार्यातून आपल्याला नवी प्रेरणा मिळते, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मन की बात कार्यक्रमात केलं. समाजासाठी निस्वार्थ वृत्तीनं काम करणाऱ्या विविध व्यक्तींचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं मोदी म्हणाले. कोकणातल्या हापूसप्रमाणेच देशाच्या विविध भागात आढळणाऱ्या आंब्याच्या प्रकारांचा उल्लेख करुन त्यांनी आंबा उत्पादनाचा प्रवास गावखेड्यातून जागतिक बाजारपेठेपर्यंत झाला आहे असं सांगितलं.

आपल्या छंदासाठी वेळ काढणं आणि सतत काहीतरी नवीन शिकत राहणं गरजेचं आहे असं सांगून विद्यार्थ्यांनी सुट्टीचा उपयोग यासाठी करावा असं पंतप्रधान म्हणाले. तारांगण पाहायला जाणं किंवा खगोलशास्त्र मंडळाचे सदस्य होणं अशा गोष्टी अवश्य करा असं सांगताना पंतप्रधान म्हणाले.....

**साथियों रात में तारों को निहारना अपने आप में अद्भुत अनुभव होता है। ज्योतिर्विद्या परिसंस्था भी एस्ट्रोनॉमी के सबसे पुराने संस्थानों में से एक है। यहां ऑब्जर्वेशनल फैसिलिटीज के साथसाथ बुक्स, लाइब्रेरी और टेलीस्कोप लाइब्रेरी की सुविधा भी है। मैं युवाओं से आग्रह करूँगा की वे किसी एस्ट्रोनॉमी क्लब से जरूर जुड़े और इन छुट्टियों में किसी प्लैनेटेरियम को भी जरूर देखने जाए।**

पुण्यातील ज्योतिर्विद्या परिसंस्थेचा उल्लेख पंतप्रधानांनी कालच्या भागात केला. याबाबत बोलताना संस्थेचे उपाध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे म्हणाले.....

**एकोणीसशे चव्वेचाळीस साली स्थापन झालेल्या या संस्थेच्या अगणित सभासदांनी केलेल्या कामाची ही पोचपावतीच म्हणायला लागेल. इंग्रजी राजवटीत खगोलशास्त्राचा अभ्यास अभ्यासक्रमातून काढून टाकल्यामुळे पुण्यातील काही नामवंत लोकांनी एकत्र येऊन ज्योतिर्विद्या परिसंस्थेची स्थापना केली. आकाश दर्शनाचे कार्यक्रम, प्रदर्शने वेधशाळांच्या अभ्यासली, खगोलशास्त्रीय अभ्यास वर्ग अशा अनेक माध्यमातून वर्षभर खगोलशास्त्राचा प्रसार चालू असतो. तसेच निरीक्षणासाठी, वेगवेगळ्या दुर्बिणी संस्थेकडे आहेतच पण सभासदांसाठी पुस्तके आणि दुर्बिणी यांची लायब्ररी पण आहे. सभासदांच्या अभ्यासासाठी लोकमान्य टिळकांच्या केसरीवाड्यावरती संस्थेची स्वयंचलित दुर्बिण असून त्यातून रूपविकारी ताऱ्यांची निरीक्षणे घेतली जातात तर लघुग्रहांच्या पिधानांचीही निरीक्षणे घेतली जातात.**

**त्याचप्रमाणे उल्का वर्षावाची पण निरीक्षणे ज्योतिर्विद्या घेते. ही सगळी निरीक्षणे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठवली जातात. जगभराचे खगोल निरीक्षक त्यांचा वापर करतात.**

सध्या देशाच्या अनेक भागात कडक उन्हाळ्याची स्थिती आहे. अशा वेळी नागरिकांनी सतत थोडं थोडं पाणी पित राहावं आणि सरकारनं दिलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षात ठेवून त्याप्रमाणे राहणीमानात बदल करावा असासल्ला पंतप्रधानांनी दिला.

अलीकडेच केलेल्या पांच देशांच्या दौऱ्याचा उल्लेख करत, नेदरलँडस् भेटीत, 'चोल' साम्राज्य काळातला ताम्रपट भारतात परत आणल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली.

आपल्या 'मन की बात' कार्यक्रमात, क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडूंनी अलीकडेच केलेल्या कामगिरीचा पंतप्रधानांनी गौरव केला.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

चांगल्या कामाचं कौतुक करणं आणि आवश्यक असेल तेव्हा निर्भीडपणे चुकीच्या गोष्टींवर टीका करणे, हाच पत्रकारितेचा खरा धर्म आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी एकलं. केरळमधील कोट्टायम इथे काल, 'दीपिका मल्याळम दैनिका'च्या 140 व्या स्थापना दिनाच्या सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते 'दीपिका एक्सलन्स पुरस्कार' प्रदान करण्यात आले. केवळ घटनांचं वृत्तांकन करण्यापलीकडे जाऊन, पत्रकारितेने आशा, नवनिर्मिती, करुणा आणि वैज्ञानिक प्रगतीशी संबंधित कथांनाही ठळकपणे समोर आणले पाहिजे, असंही ते पुढे म्हणाले. या कार्यक्रमाला, राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर आणि मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन उपस्थित होते.

**<u>सरसेनाध्यक्ष</u>**

जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी काल देशाचे नवीन सरसेनाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत, साऊथ ब्लॉक प्रांगणात झालेल्या समारंभात त्यांना मानवंदना देण्यात आली. सरसेनाध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी ते, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत होते. गेल्या वर्षी 31 जुलैला, लष्कर उपप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. पदभार स्वीकारल्यानंतर, त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. विचार आणि कृतीमधील नाविन्य हे लष्करी क्षमतांच्या विकासाला गती देईल असं, ते यावेळी बोलताना म्हणाले.

**<u>नवे नौदल प्रमुख</u>**

देशाचे 27 वे नौदलप्रमुख म्हणून ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी काल पदभार स्वीकारला. ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्याकडून त्यांनी नौदल प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली.

**<u>निधन-सुमन कल्याणपुर</u>**

भावसंगीतात आपल्या मखमली आणि मधाळ स्वरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचं काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन झालं. त्या 89 वर्षांच्या होत्या. सुमन कल्याणपूर यांच्या निधनानं संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे.

28 जानेवारी 1937 या दिवशी अविभाजीत भारतातल्या ढाका इथं त्यांचा जन्म झाला. गायन आणि चित्रकलेची आवड असलेल्या सुमनताईनी पंडित लक्ष्मण राव अमृते, पंडित केशवराव भोळे , उस्ताद खान अब्दुल रहमान खान आणि पंडित यशवंत देव यांच्याकडून शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं. सुमन हेमाडी या नावानं संगीत क्षेत्रात प्रवेश केलेल्या सुमनताई लग्नानंतर सुमन कल्याणपूर या नावानं प्रसिद्ध झाल्या. 1952 मध्ये ऑल इंडिया रेडिओवर गाण्याची संधी त्यांना मिळाली. 'केतकीच्या बनी'सारखं भावगीत, 'निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई' सारखी अंगाई, गवळण, विरहगीतं, भावगीतं, भक्तीगीतं, बालगीतं अशा वैविध्यपूर्ण मराठी गाण्यांनी त्यांनी एक काळ गाजवला. भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, गीता दत्त, शमशाद बेगम या गायिकांच्या तारकामंडळात त्यांनी स्वतः चं स्थान निर्माण केलं. 'अजहून आये बालमा', 'ठहरिये होश मे आ लूँ', 'न तुम हमें जानो' सारखी असंख्य गाणी गाऊन त्यांनी हिन्दी चित्रपट संगीतातही आपला वेगळा ठसा उमटवला.

अत्यंत भावपूर्ण आणि मधुर आवाजात त्यांनी मराठी, हिंदीसह विविध भाषांमधील हजारो गाणी अजरामर केली. त्यांच्या आवाजातली सात्त्विकता आणि भाव रसिक मनाला थेट भिडणारे होते.

'सुमन सुगंध' हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशित झालं आहे. संगीतातल्या त्यांच्या अमूल्य योगदानासाठी त्यांना, 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं, तर मध्य प्रदेश सरकारनं त्यांना 'लता मंगेशकर' पुरस्कारांनं सन्मानित केलं आहे.

भारतीय संगीत क्षेत्रातील दैवी आणि सुरेल 'सुमन' असा स्वर आज शांत झाला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांनी सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीचं जेतेपद मिळवलं. काल झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात सात्विक आणि चिरागनं इंडोनेशियाच्या जोडीचा 18-21, 21-17, 21-16 असा पराभव केला.

केंद्रिय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय आणि ज्योतिरादित्य सिंदिया यांनी सात्विक चिराग जोडीचं या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे.

**<u>आय पी एल-अंतिम सामना</u>**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने, काल इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल क्रिकेट स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं. या स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ दुसऱ्यांदा विजेता ठरला आहे.

काल अहमदाबाद मध्ये खेळल्या गेलेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघावर 12 चेंडू आणि 5 गडी राखून विजय मिळवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून, प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरू संघाच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत, गुजरात टायटन्स संघाला 155 धावांवर रोखून धरलं. यात, वॉशिंगटन सुंदरने केलेल्या नाबाद 50 धावांचा समावेश आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाच्या विराट कोहलीने फटकावलेल्या नाबाद 75 धावा निर्णायक ठरल्या. विराटला सामनावीर तर, वैभव सूर्यवंशीला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

गुजरात, केरळम, लक्षद्वीप, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, ओडिशा, दक्षिण अंतर्गत कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि पश्चिम मध्य प्रदेश या भागांत आज मुसळधार पावसाचा भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच, मध्य महाराष्ट्र, ओडिशा आणि पश्चिम मध्य प्रदेश या भागांत गारपिटीची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

पुढील चार ते पाच दिवसांत नैऋत्य मोसमी पाऊस अर्थात, मॉन्सूनची आगेकूच होण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं आय एम डी नं म्हटलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.